FORM-1 A N.C.R.B. I.I.F.-I 19

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा बृहन्मुंबई पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. 07/24 दिनांक 11/02/2024
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्रतिबंधक अधिनियम 1988, कलमे Sections कलम 7
(ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार, तारीख पासून 16/02/24, वेळ 11.00, तारीख पर्यंत 10/02/24, वेळ 21.00
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख 10/02/2024, वेळ 11.00
Information received at P.S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 07/2024, तारीख 11/02/2024, वेळ 04.15 वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी तक्रारी अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा 07 कि.मी दक्षिण, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव कॅफे परविन, ठिकाणाचे नंबर ..., गल्ली ..., रस्त्याचे नाव अब्दुल रहेमान स्ट्रीट
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण पायधुणी, गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाऱ्याचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name मोहम्मद वसीम मन्सुरी (b) वडीलाचे / पतीचे नाव मोहम्मद रफीक मन्सुरी
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 28 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 8329225874
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ... दिल्याचा दिनांक ... दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय ...
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता : रुम नं 92 गल्ली / सर्वे नं. 01 माळा घर / नाव नंबर कान्यवाला बिल्डींग फोन /मो. नंबर ... पॅन नं ... वोटर्स नं. ...
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव पाक्मोडिया रोड जवळचे प्रसिद्ध ठिकाण मांडवी गाव ... पोस्ट ... पो. स्टे. पायधुणी
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ... जिल्हा मुंबई राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता ...
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

- विशाल गोविंद यादव वय-40 वर्षे, पद- पो.ह.क्र 041002, नेमणुक आर्थिक गुन्हे शाखा CB CONTROL, मुंबई रा.ठि. सी/7, डी.डी. मार्ग पोलीस वसाहत, केनिंग्टन रोड, मुंबई 400007

# फिर्याद

दिनांक ११/०२/२०२५

मी मोहम्मद वसीम मोहम्मद रफिक मन्सूरी वय ३८ वर्षे, धंदा – व्यवसाय (पान तंबाखु किरकोळ विक्रेता), रा.ठी. रुम नं १३,पहिला माळा, १५८, काचवाला बिल्डींग, एस्किन रोड, मांडवी, मुंबई –४००००३, मो. क्र. ९३२१२२६८४३, आधार कार्ड क्र. ६५९४१०५९२३०४.

———

मी वरीलप्रमाणे असून मागील १३ वर्षापासुन माझे कुटुंबिया समवेत राहण्यास आहे. मी सन २०२२ ते २०२३ मध्ये होलसेल मध्ये तंबाखु व सुपारीचा माल माझे नळ बाजार, जे जे मार्ग, मुंबई येथील भाडयाच्या दुकानातुन विक्री करत असे. सदर व्यवसायातुन फायदा मिळत नसल्याने, मी सदर व्यवसाय बंद केला व माझा पुर्वापार असलेला भंगाराचा धंदा करु लागलो, परंतु त्यामध्येही काही फायदा मिळत नसल्याने व माझी आर्थिक स्थिती चांगली नसल्याने मागील एक महीन्यापासुन मी नागपाडा, जेजे मार्ग, डोंगरी, मुंबई या भागातील लहान लहान दुकानदारांना किरकोळ स्वरुपात तंबाखु व सुपारी माल देण्याचे काम करुन त्यामधून मिळणाऱ्या उत्पन्नातून माझा व कुंटुबियाचा उदरनिर्वाह चालतो.

मी यापुर्वी तंबाखु सुपारीचे दुकान चालवत असल्याने बृहन्मुंबई पोलीस विभागाचे EOW(सीबी–कंट्रोल) येलोगेट चे साहेब (पोलीस) विशाल यादव आम्ही ऐकमेकांना ओळखतो. मागिल महिन्यामध्ये मी दुकानदारांना किरकोळ स्वरुपात तंबाखु व सुपारी माल देण्याचे काम करत असताना जानेवारी २०२५ च्या पहील्या आठवडयात मला EOW (सीबी–कंट्रोल) येलोगेट चे साहेब (पोलीस) विशाल यादव हे कॅफे परविन समोर, पायधुनी पोलीस ठाणेजवळ, येथे भेटलो होतो व त्यांनी मला मी करत असलेल्या व्यवसायाबाबत त्यांच्या कार्यालयात येवुन भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे दिनांक १०/०१/२०२५ किंवा ११/०१/२०२५ रोजी त्यांच्या यलोगेट पोलीस ठाणे बिल्डींग मधील तिसरा माळयावर जावुन त्यांना मी भेटलो व त्यांना मी सध्या नागपाडा, जेजे मार्ग, डोंगरी या भागातील लहान लहान दुकानदारांना किरकोळ स्वरुपात तंबाखु व सुपारी माल देण्याचे काम करत असल्याचे सांगुन त्यांना मदत करण्यास सांगितले. तेव्हा साहेब (पोलीस) विशाल यादव यांनी मला ते मोठया साहेबांना सांगुन व्यवसाय चालु ठेवण्यास मदत करतील असे सांगितले व गुड लक म्हणुन काही पैसे दयावे लागतील व दर महिन्याला पैसे दयावे लागतील असे सांगुन व्यवसाय चालु राहील असे सांगितले.

मला व्यवसाय करायचा असल्याने, मी दिनांक १६/०१/२०२५ रोजी EOW (सीबी–कंट्रोल) येलोगेट चे साहेब (पोलीस) विशाल यादव यांना येलोगेट येथील कार्यालयात जावुन पुन्हा त्यांचेशी माझे व्यवसाय चालु ठेवण्या बाबत बातचीत केली व त्यांनी मला गुडलक म्हणुन रक्कम रु.५०००/– देण्यास सांगितले व दर महीन्याला रु. १०,०००/– दयावे लागतील असे सांगितले. मी त्याचदिवशी त्यांना रु.५०००/– हे गुड लक म्हणुन दिले व विशाल यादव साहेब यांनी मला दर महीन्याच्या ५ ते ७ तारखेच्या दरम्यान वरील ठरल्या प्रमाणे महीन्याचे पैसे दिले तर धंदा चालु ठेव असे सांगितले. त्यांनतर दिनांक ०७/०२/२०२५ रोजी साहेब (पोलीस) विशाल यादव यांचे मोबाईल कमांक ८८५०३५५९४३ वरुन माझे मोबाईल कमांक ९३२१२२६८४३ यावर सकाळी ११.३७ वा. फोन आला व त्यांनी मला ठरल्याप्रमाणे रु.१०,०००/– घेवुन तु आला नाहीस ? असे बोलेले त्यावेळी मी त्यांना सोमवार दिनांक १०/०२/२०२५ रोजी येवुन भेटतो असे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला येणेपुर्वी फोन करुन येणेस सांगितले.

मला EOW(सीबी–कंट्रोल) येलोगेट चे साहेब (पोलीस) विशाल यादव यांना रुपये १०,०००/– इतक्या रक्कमेची लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १०/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयात हजर राहून वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे स.पो.आ.सोपान

चिटटमपल्ले व सपोआ प्रविण नावडकर यांना भेटुन EOW(सीबी–कंट्रोल) येलोगेट चे साहेब (पोलीस) विशाल यादव हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार दिली. मला मराठीत लिहता येत नसल्याने, मी सांगितल्याप्रमाणे माझी सदरची तक्रार ही सपोआ श्री.नावडकर यांनी संगणकावर मराठीत टंकलिखीत करुन ती पंचांनी हिंदीमध्ये मला समजावून सांगितली. माझ्या सांगण्या प्रमाणे मी दिलेली तक्रार बरोबर व खरी असल्याने सदर तक्रार अर्जावर मी त्यावर सही करून दिली.

त्यानंतर सपोआ प्रविण नावडकर यांनी तेथे उपस्थित असलेल्या दोन पंचांना माझा तक्रारी अर्ज वाचण्यास दिला तेव्हा सपोआ प्रविण नावडकर यांनी सांगितलेली हकीकत व मी दिलेली लेखी तक्रार सारखीच असल्याचे पंचानी खात्री करून माझा तक्रार अर्ज वाचून त्यावर सहया केल्या. त्यानंतर सपोआ प्रविण नावडकर यांनी समक्ष म्हणून सही करुन तो तक्रार अर्ज स्वतःच्या ताब्यात ठेवला.

त्यानंतर सपोआ प्रविण नावडकर यांनी दि.१०/०२/२०२५ रोजी तक्रार अर्जासबंधी असलेल्या लोकसेवकांकडे पडताळणी बाबत विचारणा केली असता, त्यावेळी मी सांगितले की, साहेब (पोलीस) विशाल यादव यांनी मला दिनांक १०/०२/२०२५ रोजी भेटावयास बोलविले आहे. त्यामुळे सपोआ प्रविण नावडकर यांनी लगेच पडताळणी कारवाई करणार असल्याचे सांगितले. पडताळणी कारवाई च्या अनुषंगाने लाप्रवि येथिल गोपनिय कक्ष येथे सपोआ प्रविण नावडकर, स.पो.आ. सोपान चिटटमपल्ले मी व पंच आम्ही गेलो असता. सपोआ नावडकर यांनी पंचांना मी (पोलीस) विशाल यादव यांना मोबाईलवरुन कॉल करणार असल्याचे सांगितले. व नमुद मोबाईलवरील संभाषण ते पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करणार असल्याचे सांगून त्यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालू केला व मला कॉल करण्याचा इशारा केला असता मी विशाल यादव यांना कॉल केला असता त्यांनी सायंकाळी ०७.०० ते ०७.३० वाजताच्या दरम्यान पायधुणी पोलीस ठाणे जवळील कॅफे परविन येथे भेटण्यास सांगितले.

त्याप्रमाणे सपोआ नावडकर यांनी मला पडताळणी कारवाई चालु करण्यात येत असून माझी सापळा पथकाशी ओळख करुन देऊन सपोआ चिटटमपल्ले, मी, दोन पंच व सापळा पथक असीबी वरळी कार्यालय येथून शासकीय वाहनांनी रवाना झालो. अदांजे ०६.०० वाजता आम्ही कामा हॉस्पिटल जवळ थांबलो असता ०६.४९ वाजता सुमारास साहेब (पोलीस) विशाल यादव याचा मला फोन आला तेव्हा त्यांनी मला कॅफे परवीन पायधुणी पोलीस ठाणे जवळ येथे भेटाव्यास बोलविले.

तेव्हा सपोआ नावडकर यांनी पडताळणी दरम्यान होणारे संभाषण हे माझ्या शर्टाच्या आतील भागात लावण्यात येणाऱ्या डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मायक्रो एसडी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले व माझ्या सोबत पंच प्रणेश शिंदे हे जाणार असल्याचे सांगितले त्यानंतर मी व शासकीय पंच प्रणेश शिंदे असे आम्ही (पोलीस) विशाल यादव दोघे ठरलेल्या ठिकाणी भेटाव्यास गेलो. त्यावेळी तेथे आमची भेट झाली सदरवेळी यादव यांनी **" देदे "** असे बोलून मागणी केली असता त्यास मी म्हटले की, **" अभी सुनो... दस हजार आपने मेरे को बोले थे. तेव्हा यादव यांनी " हु " असे म्हणून होकार देऊन अभी कुछ नही लाया है "** तेव्हा मी म्हटले **" सात हजार करके देता हु,आधे घणटेका टाईम दो मे कलेक्शन करके लाके देता हु "** तेव्हा मी म्हटले की **" फोन कर मेरे को मे इधर ही हु कुंभारवाडा मे "** त्यावेळी यादव यांनी सदरबाबतची सर्व माहिती त्यांना दिली. तेव्हा आम्ही पोलीस असलेल्या ठिकाणी परत जाऊन

त्यावेळी सपोआ नावडकर यांनी माझा आतिल भागास लावलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून ऐकला असता (पोलीस) विशाल यादव यांनी पैसे मागितल्याचे निष्पन्न झाले त्यानंतर सर्व पथका समोर सपोआ नावडकर यांनी सापळा कारवाईचे आयोजन करुन माझ्या बचेतेतील रुपये १०,०००/– सपोआ नावडकर यांच्याकडे दिले असता त्यानी पथकातील अंमलदारकडून हिरव्या रंगाची पाऊडर लावण्यात आलेल्या रुपये १०,०००/– माझ्या

शर्टच्या डाव्या खिशात ठेवली, यादव यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास खिशातील हातरुमाल काढून तोंडपुसण्याचा इशारा करण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही पंच, सापळा पथक मी लाचेची रक्कम सोबत घेऊन कॅफे परविन येथे पायी पोहचलो. अंदाजे ०८.४२ वाजता सुमारास (पोलीस) विशाल यादव यांनी मला कॉल केला व कुठे आहे असे विचारले तेव्हा मी त्यांना कॅफे परविन मध्ये आतमध्ये बसलो आहे असे सांगितले तेव्हा ते मला भेटण्याकरीता आतमध्ये येऊन माझ्या बाजुला बसले व मला म्हटले की, **“ मेरेको जाना है ” तेव्हा मी त्यास “ मेरेको कोई तकलिफ नही होना चाहिये ”** असे म्हणून थोडया वेळापूर्वी ठरल्याप्रमाणे सात हजर रुपये न देता मागणी केल्याप्रमाणे माझेकडील असलेले सर्व रुपये १०,०००/– लाचेची रक्कम त्यास दिले. त्यावेळी ती यादव यांनी लाचेची रक्कम स्विकारली तेव्हा मला दिलेल्या सुचनाप्रमाणे खिशातील हातरुमाल काढून तोंडपुसण्याचा इशारा केला असता त्यानंतर सापळा पथकातील पोलीसांनी तात्काळ (पोलीस) विशाल यादव यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले.

तरी श्री.विशाल गोविंद यादव (पोलीस) EOW(सीबी–कंट्रोल) येलोगेट मुंबई यांनी मला तंबाखु व सुपारीचे किरकोळ विक्री नागपाडा, डोंगरी, जेजे मार्ग परिसरात व्यवसाय चालविण्यासाठी तसेच व्यवसायात मदत करण्यासाठी माझ्याकडे दर महिन्याला रुपये १०,०००/–इतक्या लाचेची मागणी केली माझी लाच देण्याची इच्छा नसल्याने दिनांक १०/०२/२०२५ रोजी पंचासमक्ष रुपये १०,०००/–माझेकडून स्विकारली म्हणून माझी श्री.विशाल गोविंद यादव (पोलीस ) EOW(सीबी–कंट्रोल) येलोगेट मुंबई यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वर नमुद जबाब सपोआ नावडकर यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मला हिन्दी भाषेत समजावुन सांगितला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( प्रविणा नावडकर ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Wasim